# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली, दिनांक ७/८/२०१८

## जागतिक आदिवासी दिनानिमित्य विकास दौड चे आयोजन

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी जागतिक आदिवासी दिना निमित्य गडचिरोली येथे **विकास दौड** चे आयोजन केलेले आहे. मागील १५ दिवसापासुन गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन, उप पोलीस स्टेशन व पोलीस मदत केंद्राचे स्तरावर विकास दौड चे आयोजन करण्यात आलेले असुन त्यातुन ५ युवक व ५ युवती असे एकुण ५६५ युवक-युवतींची गडचिरोली येथे होणा-या विकास दौड करीता निवड करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त इतर नागरीकांनाही या विकास दौडमध्ये सहभागी होता येणार आहे.

सदर विकास दौड ही इंदिरा गांधी चौक, गडचिरोली येथुन दिनांक ९ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ०८.०० वाजता सुरु होवून कारगिल चौक, आयटीआय चौक, सामान्य रुग्णालय, जिल्हा न्यायालय, एमआयडीसी टि पाईंट मार्गे पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथील एम.टी. गेट येथे संपणार आहे. सदर विकास दौड करीता जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गडचिरोली पोलीस दलातर्फे करण्यात आले आहे.

